म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. नं. ४९८
RFFBK-0019243

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
स. नं. ४

॥ श्री ॥


# हद्दपार बंगाली

प्रकाशकः-- वर्तमान एजन्सी.

"राष्ट्रमत" छापखान्यांत छापिलें

किंमत ४ आणे.

स्थळप्रत
म. मं. सं. का.



REFBK-0019243

श्रीयुत अश्विनीकुमार दत्त.

श्री ग्रंथ संग्रहालय
नं. 12२८
ना.
ठाणे.

ग्रंथ संग्रहालय
नं. ५
ठाणे.

# श्रीयुत अश्विनीकुमार दत्त.

बुद्धिमत्ता, नीतिमत्ता, स्वदेशाविषयींची कळकळ, स्वार्थत्याग, स्वदेशकार्यीं संपत्तीचा विनियोग, लोकमान्यता, कोणत्याही दृष्टीनें पाहिल्यास श्रीयुत अश्विनीकुमार दत्त यांना हद्दपार झालेल्या सर्व देशभक्तांमध्यें अग्रपूजेचा मान मिळाला पाहिजे. अश्विनी बाबूंचा जन्म १८५६ च्या जानेवारी महिन्यांत झाला. यांचे वडील बाबू व्रजमोहन दत्त हे १४ रुपयाच्या शाळामास्तरापासून ते १००० रु० दरमहाच्या स्मॉल कॉज कोर्टाच्या जजाच्या जागेपर्यंत चढले होते. बाबू व्रजमोहन यांचा जन्म जरी सरकारी नोकरींत गेला तरी त्यावेळचे ले. गव्हरनर यांनीं अश्विनी कुमार यांची तरतरी पाहून त्यांना मोठी नोकरी देऊं केली त्यावेळीं त्यांनीं साफ नाहीं ह्मणून सांगितलें, व अश्विनीकुमारांनीं स्वतंत्रपणें रहावें अशी आपली इच्छा दर्शविली. अश्विनी बाबूंची मातोश्री फार कुशल गृहिणी असून अत्यंत प्रेमळ परंतु करारी व धार्मिक बायको होती. हिचे पुष्कळ गुण अश्विनी बाबू यांच्या अंगीं उतरले आहेत. अगदीं लहान पणापासून अश्विनीकुमार यांची धर्माकडे प्रवृत्ति आहे. सर्व लोकांवर त्यांचें आज सारखेंच प्रेम आहे. त्यांची सत्यनिष्ठा तर प्रसिद्धच आहे. ते कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या प्रवेश परिक्षेंत पास झाले तेव्हां त्यांचें वय मुद्दाम कमी घातलें गेलें होतें परंतु तें त्यांना न खपून

दा. क्र. १९०२१३

शेवटीं चुकलेलीं दोन वर्षे त्यांनीं स्वस्थ बसून काढलीं व नंतर पुढील परी क्षेस ते गेले. यांची एम्. ए. व बी. एल् अशा दोन्ही परीक्षा पास झालेल्या आहेत. कायद्याची परीक्षा झाल्यावर कांहीं दिवस पर्यंत अश्विनी बाबू वकीली करीत होते. वकीलीच्या धंद्यांत कराव्या लागणाऱ्या लफंडावाला कंटाळून त्यांनीं तो धंदा सोडून दिला व तेव्हां पासून त्यांनीं शिक्षकाचें काम पत्करलें. त्यांच्या वडिलांनीं स्थापन केलेली शाळा पुढें कॉलेजाच्या दर्जाला पोंचली व याच ब्रजमोहन कॉलेजाचें काम अश्विनि बाबूंनीं अंगावर घेतलें व तें उत्कृष्ट रीतीनें चालविलें. या कॉलेजसंबंधीं व तेथील शिस्ती संबंधीं अधिकारी व इतर लोक सर्वांचेच अभिप्राय उत्तम आहेत. अगदीं परवांपर्यंत श्रीयुत अश्विनीकुमार हे सर्वत्रांस सारखेच प्रिय होते. त्यांचें वजन विलक्षण असून ते सीध्या मार्गानें जाणारे असल्यामुळें अधिकाऱ्यांनाही त्यांच्या उलट कांहीं बोलतां येत नसे. ते राजकीय चळवळींत सहसा पडत नसत.

बंगालच्या फाळणीमुळें सर्व बंगाल्यांत जो एकच हाहा:कार झाला त्या वेळेपासून या अन्यायानें अश्विनी बाबूंचें मन उद्विग्न झालें व ते स्वदेशी–बहिष्काराच्या राजकीय चळवळींत पडले. शिक्षणाचे कामीं, व दुष्काळाच्या विपत्तींत सांपडलेल्या लोकांस सोडविण्याचे कामीं अश्विनीकुमार हे अत्यंत परिश्रम घेत असत व त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळें व लोककार्याचे कामीं दिसून येणाऱ्या तत्परतेमुळें त्यांचें लोकसमाजावर विलक्षण वजन असे. या वजनामुळेंच अधिकाऱ्यांची त्यांच्यावर इतराजी झाली असें पुष्कळांचें ह्मणणें आहे. इतर देशभक्तांप्रमाणें अश्विनी बाबूही स्वदेशी–बहिष्काराच्या चळवळीचे प्रवर्तक होते.

" पूर्वबंगालचे अनभिषिक्त राजे " असें त्यांना लोक ह्मणत असत. त्यांच्या कळवळ्याच्या अंत:करणामुळें लोकांचें त्यांच्यावर अकृत्रिम प्रेम वसलेलें आहे. वहकलेल्या तरुण मंडळीनें केलेल्या अत्याचाराचा त्यांना अत्यंत तिटकारा असे. असल्या अनन्वित कृत्यांनीं देशकार्यास धक्का बसतो असे ते वरचेवर प्रतिपादन करीत. आपल्या सर्व चळवळी कायद्याच्या मर्यादेंत असल्या पाहिजेत असें ते आपल्या भाषणांत नेहमीं बजाऊन सांगत असत. तथापि स्वदेशी—बहिष्काराचे मात्र ते कट्टे भक्त होते. या चळवळींत त्यांनीं कांहीं उणें पडूं दिलें नाहीं.

त्यांच्यावर सरकारनें कांहीं आरोप ठेवलेला नाहीं व त्यांची चवकशीहि व्हावयाची नाहीं. सरकारच्या मनांत कोणच्या कारणासाठीं रोष आला आहे हें लोकांना कळण्याचा मार्ग नाहीं. अपराधाशिवाय पकडण्यांत आलेल्या या देशभक्तास लखनौच्या तुरुंगांत टाकण्यांत आलें आहे. श्रीयुत अश्विनीकुमार यांना पकडण्यांत आलें त्यावेळीं ते आपल्या शाळेच्या हेड मास्तरच्या घरीं श्री० सतीश्चंद्र यांच्या समवेत सकाळीं नऊ वाजतां कांहीं धार्मिक कृत्यांत गुंतले होते. अशावेळीं त्यांच्या घरास गराडा घालण्यांत आला व त्यांना घरीं बोलावून घेण्यांत आलें. तयारीला फक्त वीस मिनिटांची अवधि देण्यांत आली होती. मला लाला लजपतराय यांच्या प्रमाणें फक्त हद्दपार करीत आहेत तेव्हां भिण्याचें कांहीं कारण नाहीं असें त्यांनीं जातांना आपल्या घरांतील मंडळीस सांगितलें. अश्विनीबाबूंनी कांहीं थंडीचे कपडे, ५० रुपयांची एक नोट, टेनीसनचीं काव्यें व श्रीमद्भागवत येवढेच कायते जिन्नस बरोबर घेतले. बरोबर नोकर घेण्यास परवानगी मिळाली नाहीं. गाडींतून नदीवरील

आगबोटीवर चढल्यावर लागलीच आगबोट हाकारण्यांत आली. त्यांचें कुटुंब व इतर मंडळी नदीकांठीं आली होती परंतु तेथें भेटण्यास परवानगी मिळाली नाहीं. कांहीं दिवस पर्यंत हव्यातशा गप्पा उठत होत्या, परंतु त्यांच्या पुतण्यास त्यांचें कांहीं दिवसांनीं पत्र आल्यावरून अश्विनीबाबूंची योजना लखनौच्या तुरुंगांत झाली आहे असें कळून आलें. श्रीयुत अश्विनीकुमार यांची प्रकृति पुष्कळ वर्षें नादुरुस्तच आहे. त्यांना मधुमेहाचा विकार कायमचा आहे. सुरतेच्या कॉंग्रेसनंतर ते पांच सहा महिने माथेरानास येऊन राहिले होते. लखनौच्या ऊष्ण हवेंत त्यांना त्रास होतो व त्यांचा विकार वाढतो अशी करण्यांत आलेली तक्रार निराधार असून त्यांची प्रकृति चांगली आहे, असें येथील अधिकाऱ्यांचें ह्मणणें आहे. दिवसा तुरुंगांत एक तासभर फिरण्यास त्यांना मोकळीक आहे, व कांहीं पुस्तकें वाचण्यास वगैरे परवानगी आहे; परंतु रात्रभर त्यांना कोंडून ठेवण्यांत येतें. खाण्यापिण्याची व्यवस्था बरी आहे व आपल्याला चांगलें वागविण्यांत येतें, असें त्यांच्या पुतण्याला आलेल्या पत्रांत त्यांनीं लिहिलें आहे. हीं पत्रें हिंदुस्थानसरकारकडून तपासून नंतर येत असतात व त्यांना पाठविलेलीं पत्रेंही त्याच मार्गानें त्यांना पोंचतात.

# सतीश्चंद्र चतरजी.

श्रीयुत अश्विनीकुमार दत्त यांच्या ब्रजमोहन इन्स्टिट्यूशनमध्यें **श्रीयुत सतीश्चंद्र चतरजी** हे प्रोफेसर होते. स्वदेशी चळवळींतील हे कार्यकर्ते पुढारी होते. अश्विनी बाबूंना यांचें अत्यंत सहाय्य असे. एकदां चार गुरखे अंगावर आले असतां त्यांनीं त्या चवघांसही पळवून लावलें. त्यांच्या चरित्रांतील विशेष गोष्टी फारशा कोणास माहीत नाहींत. मुकाट्यानें लोकहिताचीं कामें करून कीर्तीची अपेक्षा न बाळगणाऱ्या सच्छील सज्जनांपैकीं सतीश बाबू हे एक होते. असल्या सत्पात्र विद्वानाला हद्दपार करण्याची बुद्धि सरकारला कां व्हावी हा एक महत्वाचा प्रश्न आहे व हा ज्याचा त्यानें सोडवावयाचा आहे.

# श्रीयुत पुलिनविहारी दास.

**श्रीयुत पुलिनविहारी दास** हे डाका जिल्ह्यांतील बिकरामपूरचे रहाणारे असून एका प्रसिद्ध डेप्युटी मॅजिस्ट्रेटचे चिरंजीव आहेत. यांचें वय सध्या ३३ वर्षांचें आहे. यांचा शाळेंत असतांना अभ्यास वगैरे उत्कृष्ट असे परंतु बी. ए. पास होण्यापूर्वींच त्यांनीं अभ्यास सोडला. एकेकाळीं यांचें घराणें फार श्रीमंत असे परंतु सांप्रत खाऊन पिऊन सुखी कुटुंबांमध्यें यांचें कुटुंब मोडतें. दोन वर्षांखालीं एका पाठीमागून एक असे पोलीसांनीं यांच्यावर जेव्हां खटले केले त्यावेळीं यांचें नांव सर्वतोमुखीं झालें. प्रथम बरा दरवड्याच्या खटल्यांत यांच्यावर फिर्याद करण्यांत आली होती परंतु त्यांतून ते दोषमुक्त झाले. पूर्वबंगाल्यांत एका वासरावरून हिंदुमुसलमानांत दंगा झाला व यांत पुलिन बाबूंचा संबंध आणून त्यांना १५ रुपये दंड करण्यांत आला. डाका कालेजिएट स्कूलमध्यें हे शिक्षक होते व डाका कॉलेजमध्यें यंत्रशाळेवर मदतनीस होते. ते अंगानें सडपातळ होते परंतु त्यांच्या विलक्षण शौर्यामुळें लोकांचीं मनें त्यांच्याकडे वेधलीं, व पोलिसांची शंकेखोर दृष्टि त्यांच्याकडे वळली. प्रसिद्ध पट्टा व तलवार खेळणार प्रो० मर्टवाझा यांचे पुलिनविहारी हे शिष्य असून, कलकत्त्याच्या प्रदर्शनांत त्यांनीं आपल्या तलवारीच्या हातांनीं सर्व प्रेक्षकांना थक्क करून सोडलें. या

समयीं त्यांनीं एका मनुष्याच्या नाकावर चिकटऊन ठेवलेला खडूचा तुकडा तलवारीनें उडवून देऊन लोकांना चकित केलें. तलवार तर गरगरा फिरतां फिरतां नाकाला चाटून खडूचा तुकडा साफ घेऊन गेली परंतु मनुष्याला इजा किंचित्सुद्धां झाली नाहीं. यांचें लग्न झालेलें आहे, परंतु मुलाबाळांचें व्यवधान कांहीं नाहीं. पुलिन बाबूंना कैद केल्यानंतर त्यांच्या आईला पोलीसानें खर्ची देऊं केली परंतु त्या वीरमातेनें पोलीसाचा धिक्कार करून ती घेण्याचें नाकारलें. "राष्ट्रीय स्वयंसेवकां" च्या संबंधानें पुलिन बाबूंचें नांव डाक्यास फार प्रसिद्ध आहे. अर्धोदय योगाचे वेळीं राष्ट्रीय स्वयंसेवकांनीं दाखविलेलें चातुर्य व तत्परता, हीं सुप्रसिद्धच आहेत. परंतु या सर्व चळवळीचा उद्देश हिंदुस्थानचें स्वातंत्र्य मिळविण्याचा आहे असें पोलीसला वाटल्यामुळें, त्यांच्यावर पोलीसनें सक्त नजर ठेवली. डाका रस्त्यावरून किंवा गंगेच्या तीरावरून धोतरांची कांस मारलेले तीन हजार स्वयंसेवक बरोबर घेऊन पुलिन बाबू जेव्हां जात तेव्हां त्यांचा तो विलक्षण पोषाख व हातांत घेतलेला बिगूल वगैरे थाट पाहून पोलीसांची त्यांच्यासंबंधीं अधिकाऱ्यांकडे वर्दी पोंचूं लागली. ते अनवाणीच चालत जात. चिनी, जपानी, ब्रिटिश वगैरे दहा तऱ्हेनें त्यांना बिगूल फुंकतां येतो. त्यांच्या बिगुलाचा आवाज गंगेच्या पलीकडे दिवसां पांच मैल व रात्रीं दहा मैल पर्यंत ऐकूं जातो. ज्यांचा गोलंडो येथें कोणी दुष्टानें खुनाचा प्रयत्न केला त्या आलन साहेबांनीं डाकाचे मॅजिस्ट्रेट असतांना पुलिन बाबूंना "डाकाच्या रेजिमेंटचें कमांडर इन् चीफ" ह्मटलें होतें. ही गोष्ट कोर्टांतही नमूद झालेली आहे. मुलांच्या तालमी, आखाडे वगैरे संस्था

असतात त्यापैकींच स्वयंसेवक ही एक संस्था होती. परंतु पोलिसांना ती फार भयंकर वाटली व स्पेशल क्राईम्स ॲक्ट पास झाल्यावर सुद्धां जेव्हां ही संस्था मोडण्यांत आली नाहीं, तेव्हां एके दिवशीं पहांटे तीन वाजतां आपल्या प्रियपत्नीसमवेत ते निद्रावश झाले असतांना श्रीयुत पुलिनविहारी दास यांना पोलीसांनीं एकाएकीं उचलून नेलें. सरकारचा पुलिन बाबूंवर इतका रोष कां हें बंगाली लोकांना कळतच नाहीं, कारण त्यांची राजनिष्ठ म्हणून ख्याति असे, व व्हिक्टोरिया राणीचे तर ते मोठे भक्त असत. परंतु सरकारचे गुप्त हेतू कोणाला कळणार आहेत !

स्थळप्रत
म. ग्रं. सं. ठाणे.

…ग्रंथ संग्रहालय…
नं. …
ता. …
ठाणे.

# श्रीयुत भूपेशचंद्र नाग.

**श्रीयुत भूपेशचंद्र नाग** हे डाका जिल्ह्यांत बराडी गांवचे रहाणारे असून यांचें वय अवघें २७ वर्षांचें आहे. हे एका प्रसिद्ध जमिनदार घराण्यांतले असून त्यांचे नातेवाईकही मोठमोठे लोक आहेत. त्यांचे वडील बाबू शंभुचंद्र नाग हे स. जज्ज होते व त्यांनीं फार लौकिक मिळविला होता. त्यांचे चुलते बाबू शिवचरण नाग हे ही नांवाजलेले सरकारी नोकर होते. त्यांचे कित्येक अगदीं जवळचे नातलग अद्यापही सरकारी नोकर आहेत. भूपेश बाबूंचे वडील बंधू डा. जे. सी. बोस यांच्या बरोबर दोन वर्षांखालीं विलायतेस गेले व अद्यापही ते तिकडेच आहेत यांची मातोश्री ही सत्वशील हिंदु स्त्री असून पतिमरणानंतर १२ वर्षें तिनें फळफळावळीशिवाय कांहीं खाल्लें नाहीं. गेल्यावर्षी मोठ्या मिनतवारीनें भूपेश बाबूंनीं थोडी चपाती खाण्याविषयीं या साध्वीचें मन वळविलें, परंतु तुपाला किंवा गोडाला ती अद्यापही शिवत नाहीं.

श्रीयुत भूपेशचंद्र यांचा स्वभाव, वर्तणूक व शील हीं सर्वोत्कृष्ट आहेत. शाळेंत असतांना ते मन लाऊन अभ्यास करीत नसत परंतु बी. ए. च्या परीक्षेंत त्यांचा नंबर पुष्कळ वर आला. ते एम्. ए. चा अभ्यास करीत असतांनाच त्यांना सरकारनें उचलून नेलें. यांची काठी बळकट असून शरीर चांगलें कमाविलेलें आहे. या गोष्टीची पोलीसापाशी

ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.

# श्रीयुत सुबोधचंद्र मलिक.

श्रीयुत सुबोधचंद्र मलिक यांचा जन्म १८७९ सालीं झाला व त्यांचें वय आज केवळ ३० वर्षांचें आहे. सार्वजनिक कृत्यांविषयींची त्यांच्या अंगीं विलक्षण कळकळ असल्यामुळें व त्यांचा स्वभाव फार निग्रही असल्यामुळें लवकरच त्यांचें नांव सर्वतोमुखीं झालें. संपत्ति, औदार्य व सार्वजनिक कामांतील कळकळ या सर्व दृष्टींनीं मलिक यांचें घराणें सर्व बंगाल्यांत प्रसिद्ध आहे. कै. प्रबोधचंद्र मलिक यांचे श्रीयुत सुबोधचंद्र हे चिरंजीव होत. संस्कृत विद्येच्या कामीं शोध लावण्यासाठीं प्रतिवर्षी कलकत्ता युनिव्हर्सिटींतून स्कालरशिप देण्यांत येते हें मलीक घराण्याच्या औदार्याचेंच फळ होय. या सुप्रसिद्ध घराण्यांतील एका कर्त्या पुरुषावर ज्या सरकारास त्याच्याकडून अनेकशः मदत करण्यांत आली त्याच सरकारची इतराजी व्हावी हा कालगतीचा महिमा होय. बंगालचे माजी ले. गव्हरनर सर अँड्र्यू फ्रेजर हे हद्दपारीपूर्वी थोडेच दिवस श्री० सुबोधचंद्र यांचे घरीं जाऊन पाहुणचार घेऊन आले होते. ले. गव्हरनर येऊन गेल्यास थोडेच दिवस झाले नाहींत तोंच बाँब, हत्यारें, लुटीचा माल वगैरेच्या शोधार्थ दारोदार हिंडणाऱ्या पोलिसांची मोहीम याच घरावर झाली व एकदां हातीं कांहीं आलें नाहीं म्हणून फिरून

नोंद आहे. डाक्याच्या प्रसिद्ध अनुशीलन समितीचे हे सभासद होते. श्रीयुत पुलिनविहारी यांचे हे मदतनीस असून त्यांचा केवळ उजवा हात होते. नवीन कायदा पास झाल्यावर सरकारनें ही समिति मोडून टाकली. समिति मोडण्यासाठीं पोलीस आले त्याच्या आदल्या दिवशीं भूपेश बाबूंनी समितीचें सर्व सामान विकून टाकलें होतें. चटया व उशा सुद्धां पार विकून टाकून सर्व मंडळी रात्रीं गवतावरच निजली होती. दुसऱ्या दिवशीं पोलीस येतात तों हा थाट पाहून त्यांची हंसून पोटें दुखूं लागलीं. लवकरच १८१८ च्या तिसऱ्या रेग्यूलेशन खालीं सरकारनें श्रीयुत भूपेशचंद्र यांना हवापालट करण्यासाठीं पाठविलें. सरकारच्या मनांतील बरोबर कारणें कोणाला कळणार, परंतु लोकांचे तर्क मात्र ते सुटून येईपर्यंत चालणारच.

भूपेश बाबू हे डाका येथील राष्ट्रीय शाळेंत वेतन घेतल्या शिवाय शिक्षकाचें काम करीत असत. फत्तेगडच्या तुरुंगांतून यांचीं पत्रें येतात त्यांत आपल्या मातोश्रीच्या प्रकृतीस जपण्यासाठीं ममतेनें व आग्रहानें लिहिलेलें असतें. या पलीकडे या पत्रांत मजकूर नसतो.

# श्रीयुत सुबोधचंद्र मलिक.

श्रीयुत सुबोधचंद्र मलिक यांचा जन्म १८७९ सालीं झाला व त्यांचें वय आज केवळ ३० वर्षांचें आहे. सार्वजनिक कृत्यांविषयींची त्यांच्या अंगीं विलक्षण कळकळ असल्यामुळें व त्यांचा स्वभाव फार निग्रही असल्यामुळें लवकरच त्यांचें नांव सर्वतोमुखीं झालें. सपत्ति, औदार्य व सार्वजनिक कामांतील कळकळ या सर्व दृष्टींनीं मलिक यांचें घराणें सर्व बंगाल्यांत प्रसिद्ध आहे. कै. प्रबोधचंद्र मलिक यांचे श्रीयुत सुबोधचंद्र हे चिरंजीव होत. संस्कृत विद्येच्या कामीं शोध लावण्यासाठीं प्रतिवर्षीं कलकत्ता युनिव्हर्सिटींतून स्कालरशिप देण्यांत येते हें मलीक घराण्याच्या औदार्याचेंच फळ होय. या सुप्रसिद्ध घराण्यांतील एका कर्त्या पुरुषावर ज्या सरकारास त्याच्याकडून अनेकश: मदत करण्यांत आली त्याच सरकारची इतराजी व्हावी हा कालगतीचा महिमा होय. बंगालचे माजी ले. गव्हरनर सर अँड्रयू फ्रेजर हे हद्दपारीपूर्वी थोडेच दिवस श्री० सुबोधचंद्र यांचे घरीं जाऊन पाहुणचार घेऊन आले होते. ले. गव्हरनर येऊन गेल्यास थोडेच दिवस झाले नाहींत तोंच बॉंब, हत्यारें, लुटीचा माल वगैरेंच्या शोधार्थ दारोदार हिंडणाऱ्या पोलिसांची मोहीम याच घरावर झाली व एकदां हातीं कांहीं आलें नाहीं म्हणून फिरून

एकदां पोलीसांनीं तिकडे मोर्चा फिरविला. या झडतीच्या वेळीं पुष्कळ अमूल्य जडजवाहीर अधिकाऱ्यांच्या दृष्टीस पडलें तेव्हां त्यांच्या मनांत काय काय विचार आले असतील कोण जाणे! श्री. सुबोधचंद्र हे १९०७साला पासून बनारस येथेंच रहात असत. कलकत्त्याच्या घराची झडती झाली त्याच वेळीं बनारस येथेंही त्यांच्यावर झडतीचें वारंट बजावण्यांत आलें. श्री० सुबोधचंद्र हे स्वस्थपणें विडी ओढीत बसले होते व इकडे घराची झडती चालली होती. मध्यें कांहीं वेळ वाजाची पेटी ही वाजवीत ते बसले होते इतके या गोष्टीविषयीं ते बेफिकीर होते. पोलीस मात्र इकडे बाँबची शिकार जारीनें करीत होते. दोन्ही झडत्यांत कांहीं निष्पन्न झालें नाहीं हें सांगणें नकोच.

श्रीयुत सुबोधचंद्र यांचा बी. ए. पर्यंत विद्याभ्यास झाल्यावर ते १८९९ सालीं विलायतेस गेले व कांहीं वेळ केंब्रिजमध्यें होते. उन्हाळ्याच्या सुटींत ते घरीं परत येऊन पुन: केंब्रिज येथें गेले होते परंतु कामामुळें त्यांना परत यावें लागलें. १८९७ सालीं श्रीयुत सुबोधचंद्र याचा विवाह झाला परंतु अवध्या दहा वर्षांच्या आंतच त्यांचें कुटुंब निवर्तलें.

अगदीं थोड्या अवधींत श्रीयुत सुबोधचंद्र यांनीं बरीच सार्वजनिक कामगिरी केली. '**वंदेमातरम्**' पत्र कलकत्यास निघालें त्यावेळीं यांनीं केलेली मदत सर्वांस महशूरच आहे, व यामुळेंच त्यांना अरविंद बाबूवरील खटल्याचे वेळीं साक्ष द्यावी लागली. कलकत्यास जेव्हां राष्ट्रीय विश्वविद्यालय काढण्याचें ठरलें तेव्हां प्रथम एक लाखाची देणगी सुबोधचंद्रांनींच दिली. त्यांचें खासगी औदार्य तर अकल्पित आहे.

कोणाही सत्पात्र याचकास विन्मुख पाठविणें त्यांना माहीतच नाहीं. त्यांच्या मनाचा मोठेपणा, सौम्य व विनयशील स्वभाव, मातृभूमीवरील अकृत्रिम प्रेम व स्वदेशभक्तीमुळें सार्वजनिक कृत्यांस द्रव्यसहाय करण्याची बुद्धि या गुणामुळेंच सुबोधचंद्र हे हिंदी राष्ट्राच्या अंतःकरणांत आज वास करीत आहेत. त्यांचे कोणते दोष सरकारच्या दृष्टीस पडल्यामुळें त्यांना विना-चवकशी कारागृहांत टाकून देण्यांत आलें आहे हें कोणासही सांगतां येणें कठीण आहे. अलोट संपत्ति व ऐश्वर्य उपभोगण्याचें सोडून देशभक्तीचा खडतर मार्ग सुबोधचंद्र यांनीं जाणून बुजून पत्करला यावरूनच त्यांच्या मातृभूमीवरील प्रेमाची परीक्षा सहज करतां येईल. चैनीचीं व ऐषआरामाचीं सर्व साधनें उपलब्ध असतां त्या सर्वांवर लाथ मारून एका देशभक्तांच्या मार्गी लावण्यास सुबोधचंद्र यांस कोणत्या भुतानें पछाडलें आहे याचा विचार करूं लागलें ह्मणजे श्रीरामदासस्वामींनीं आ-पल्या मातोश्रीपुढें उद्गारलेल्यां भुताच्यां पदाची आठवण होते.

मराठी ग्रंथ
ठाणे



श्रीयुत कृष्णकुमार मित्र.

R. M. Press.

श्री ग्रंथ संग्रहालय
नं.

# श्रीयुत कृष्णकुमार मित्र.

वयानें सुमारें ४८ वर्षांचे असून श्रीयुत कृष्णकुमार मित्र हे दिसण्यांत मोठे भव्य व गंभीर आहेत. ते साधारण ब्राह्मोसमाजाचे एक उपदेशक होते. व धार्मिक व वाङ्मयात्मक विषयांतच त्यांचा बहुतेक काळ जात असे. "संजीवनी" नांवाच्या बंगाली साप्ताहिकाचे हे संपादक होते; व सिटी कॉलेजमध्यें इतिहासाचे प्रोफेसर होते. प्रोफेसरांनीं स्वदेशी सभांना जातां कामा नये व भाषणें करतां कामा नये अशीं जेव्हां सरकारी शिक्षणखात्याचीं नक्कलें निघालीं तेव्हां यांनीं आपल्या प्रोफेसरीची रजा घेतली. बंगाल्यांत मवाळ पक्ष अस्तित्वांतच नाहीं परंतु नेमस्त पक्षांत **श्रीयुत कृष्णकुमार** यांची गणना होत असे. हे श्रीयुत सुरेंद्रनाथांचे अनुयायी असल्यामुळें त्यांच्या पक्षांत मोडत असत, नाहीं तर त्यांचीं पुष्कळ मतें राष्ट्रीयांशीं जुळतीं असत. कृष्णकुमार बाबूंच्या चांगुलपणाबद्दल बिलकूल मतभेद नाहीं. अश्विनीकुमार व कृष्णकुमार या दोघांच्या हद्दपारीमुळें सर्व प्रकारच्या लोकांना जो अत्यंत विस्मय वाटत आहे त्याचें मुख्य कारण ह्मणजे दोघेही गृहस्थ अत्यंत धर्मभीरू व सीधे आहेत व बेकायदा वर्तन यांच्या कधीं स्वप्नांतही यावयाचें नाहीं, त्यांची देशभक्ति उज्ज्वल आहे व मातृभूमीसाठीं ते कोणत्याही स्वार्थत्यागाची गोष्ट करण्यास तयार हो-

तील ही गोष्ट खरी तथापि अधिकाऱ्यांच्या रोपास पात्र होण्यासारखें किंवा निदान सौम्या शस्त्रकर्त्यांच्या रोषास पात्र होण्यासारखें त्यांच्या हातून कांहीं वर्तन झालें असेल हें संभवतच नाहीं. तथापि दोघांनाही हद्दपार करण्यांत आलें आहे. फार तर काय पण बारा दरवड्यांतील माल कदाचित यांच्या घरांत सांपडेल या संशयावरून कृष्णकुमारबाबू यांच्या घराची झडती घेण्यांत आली याला काय ह्मणावें! झडतींत पोलीसास कांहीं सांपडलें नाहीं हें निराळें सांगावयास नकोच. झडती घेण्यासाठीं पोलीस आले असतां त्यांना तपासून घरांत सोडण्याची कल्पना बंगाल्यांत श्रीयुत कृष्णकुमार यांनीं काढली. पुढें प्रत्येक झडतींत याप्रमाणेंच प्रथम पोलीसांची झडती होऊं लागली. वास्तविक पहातां पोलीस ह्मणजे प्रजेचे संरक्षक परंतु त्यांच्यावर लोकांचा इतका गैरविश्वास व्हावा ही अत्यंत शोकनीय गोष्ट होय. परंतु ही शोचनीय गोष्ट ही सर्व हिंदुस्थानांत घडून आली आहे.

कृष्णकुमार बाबूंचे चिरंजीव श्रीयुत सुकुमार मित्र हे विद्वान असून परवां त्यांनी सरकारकडे आपल्या वडलांना चांगल्या रीतीनें वागविण्याबद्दल रदबदल्या केल्यापासून ते बरेच पुढें आले आहेत. श्रीयुत कृष्णकुमार यांना आग्रा येथें तुरुंगांत ठेवलें आहे. त्यांच्या जेवणखाण्याची व्यवस्था नीट व्हावी व त्यांना हवाशीर जागा रहाण्यास मिळावी यासाठीं श्रीयुत सुकुमार यांनीं सरकारशीं पत्रव्यवहार केला परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. [illegible] सेक्रेटरींनीं सांगितलें आहे की [illegible] हे [illegible] आहे ते त्यांना शिक्षा करण्याच्या बुद्धीनें नसून केवळ देशांत शांतता रहावी येवढ्याच हेतूनें

होय. हा जर शिक्षा नव्हे तर मग हद्दपार केलेल्या सद्गृहस्थांच्या खाण्यापिण्याची व रहाण्यासवरण्याची व्यवस्था त्यांच्या नेहमीच्या व्यवस्थेप्रमाणें कां असूं नये हें कोडें उलगडण्यास राजनीतीचे प्रकार माहीत असावे लागतात. असो. श्री० सुकुमार मित्र यांना सरकारनें देऊं केलेले २०० रुपये त्यांनीं घेण्याचें नाकारलें. बाबू कृष्णकुमार यांची कन्या **कुमारी कुमुदिनी मित्र** बी. ए. ही विदुषी **सुप्रभात** नांवाचें बंगाली मासिक चालवीत असते. या मासिकांत चांगल्या विद्वान लेखकांचे लेख येत असून अरविंद बाबू अलीपुरच्या तुरुंगांतून परत आल्यापासून या मासिकांत केव्हां केव्हां लिहीत असतात.

श्रीयुत सुरेंद्रनाथ बानरजी, श्रीयुत भूपेंद्रनाथ बोस वगैरे महान् महान नेमस्तांनीं कृष्ण बाबूंना सोडविण्याकरितां सरकारांत प्रयत्न केले. परंतु नेमस्त झाले म्हणून त्यांचें त्याड सरकारांत महत्वाच्या बाबतींत कसे चालणार? आमच्या पुण्याच्या नामदारांनीं तर सर कौन्सिलांत संभावना झाली. तरी पण पुण्याच्या सभेंत दारें बंद करून नामदार सरकारचा गुप्त मंत्र म्हणण्यास तयारच, कोळसा उगाळावा तितका काळाच. सर्वांचे श्रम मात्र व्यर्थ गेले इतकें खास. कृष्णकुमार हे नेमस्त पक्षाचे असून नेहमीं सरकार पक्षाचे असत परंतु स्वदेशी बहिष्काराचे ते कट्टे भक्त असल्यामुळें सरकारच्या कोपास पात्र झाले असा लोकांचा समज आहे. सर्व जन्मभर सरकारच्या पक्ष सांभाळून एखाद्या खऱ्या लोककल्याणाच्या कामीं मतस्वातंत्र्य दाखविल्यास सरकारच्या कोंधाग्नीच्या ज्वाळा कोठवर पोंचतात व कोणाकोणास होरपळून सोडतात याचा लोकांना प्रत्यय येण्यास श्रीयुत कृष्णकुमार मित्र यांची हद्दपारी पुरे आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे
१८२४३



श्रीयुत शचींद्रप्रसाद बोस

R. M. Press.

ग्रंथ संग्रहालय
नं. ........
ना. ........
ठाणे.

# श्रीयुत शचींद्रप्रसाद बोस.

श्रीयुत शचींद्रप्रसाद यांचें वय अवघें १५ वर्षांचें आहे. हे हिंदु धर्मांतून ब्राह्मो पंथांत गेल्यापासून हे श्रीयुत कृष्णकुमार मित्र यांचेजवळच रहात असत. कॉलेज स्क्वेअरमधील अँटी सर्क्युलर सोसायटीचे हे मुख्य प्रवर्तक होते. शाळेंतील विद्यार्थ्यांच्या वर्तनावर निर्बंध घालण्यासाठीं बंगालसरकारचे चीफ सेक्रेटरी मि. कार्लाइल यांनीं जें एक पत्रक काढलें होतें त्याच्या विरुद्ध चळवळ करण्यासाठीं वरील समिति निर्माण झाली होती.

'वंदेमातरम्' हे शब्द मोठ्यानें बोलूं नयेत, सभांना जाऊं नये वगैरे बरेच प्रकार या पत्रकांत नमूद केलेले होते. या हुकमाचा प्रतीकार करण्यासाठीं निघालेल्या समितीचा पुढाकार घेतल्याबद्दल कदाचित् अधिकाऱ्यांचा रोष होऊन श्रीयुत शचींद्रप्रसाद यांना सरकारनें राजकैदीची हवा दाखविली असावी.



श्रीयुत मनोरंजन गुह

R. M. Press.

# श्रीयुत मनोरंजन गुह.

कलकत्त्यातील नवशक्ति नांवाच्या सायंकाळच्या दैनिक पत्राचे संपादक श्रीयुत मनोरंजन गुह यांच्यावर एकदां राजद्रोहाची फिर्याद झाली होती व त्यावेळीं कदाचित त्यांचा छापखानाही जप्त झाला असेल. हे बारिसालच्या श्रीमान् गृहस्थांपैकीं एक आहेत. इ. आय. रेल्वेच्या एका फांट्यावर गिरिधी येथें यांच्या दगडी कोळशाच्या व अभ्रकाच्या खाणी आहेत व याच ठिकाणी त्यांना पकडून त्यांची रवानगी करण्यांत आली. कलकत्त्याच्या स्क्वेअरमध्यें हे मोठीं विनोदयुक्त भाषणें करीत असत. एकदां यांनीं आपल्या भाषणांत एक गोष्ट सांगितली. "एके ठिकाणीं एक खून होत असतां एका इसमानें पोलीस चौकीवर वर्दी दिली. परंतु ते थंडीचे दिवस असल्यामुळें पोलीस स्वस्थ निजले होते व कांहीं केल्या बाहेर पडेनात, तेव्हां त्या इसमानें शेवटीं पोलीसाला सांगितलें कीं 'पहा तो मुलगा परदेशी साखरेंत थुंकी करून ती खराब करून टाकीत आहे.' त्या बरोबर पोलीसांचे तांडेच्या तांडें भक्कम लाठ्या हातांत घेऊन बाहेर पडले." मनोरंजन बाबू हे कुटुंबवत्सल असून त्यांचें वय ४९ वर्षांचें आहे.

# श्रीयुत श्यामसुंदर चक्रवर्ती.

बंगाल्यांतील हद्दपार झालेल्या नवरत्नांपैकीं **श्रीयुत श्यामसुंदर चक्रवर्ती** यांची तसबीर उपलब्ध नाहीं. श्यामबाबू हे हद्दपार झालेल्या बंगाल्यांमध्यें सर्वांत गरीब असे आहेत. यांचा जन्म ब्राह्मण कुलांत झालेला असून ब्राह्मणाचें दारिद्र्य त्यांनीं आपणापाशीं कायम ठेवलें आहे. **'वंदेमातरम्'** या इंग्रजी पत्राशीं संबंध असल्यामुळें त्यांचा सर्व हिंदुस्थानच्या लोकांशीं परिचय आहे, परंतु बंगालच्या लोकांमध्यें उत्कृष्ट बंगाली लेखक या नात्यानें ते बहुत दिवसांपासून प्रसिद्ध आहेत. **'प्रतिभाषी'** नांवाचें बंगाली वर्तमानपत्र त्यानीं चालविलें होतें, व विचारपरिप्लुत, भारदस्त व मोहक अशा लेखांबद्दल या पत्राची फार प्रख्याति असे. परंतु द्रव्याच्या अभावामुळें हें वर्तमानपत्र लवकरच बंद पडलें. कै. श्रीयुत ब्रह्मबांधव उपाध्याय यांनीं जेव्हां **'संध्या'** पत्र काढलें तेव्हां श्यामसुंदरबाबू त्यांत लिहूं लागले व त्या पत्राची कांहीं काळपर्यंत जी विलक्षण भरभराट झाली त्याला पुष्कळ अंशीं यांचेच तेजस्वी लेख कारणीभूत झाले. आपल्या निस्पृही लेखांनीं राष्ट्रांत जागृति उत्पन्न करण्यासाठीं **'वंदेमातरम्'** हें इंग्रजी दैनिक जेव्हां कलकत्त्यांत अवतरलें त्यावेळीं श्रीयुत श्यामसुंदर हे त्यांत लिहूं लागले व या पत्राची सर्वत्र

१८२७३
२६

जी व्हावी झाली त्याला बऱ्याच अंशीं हेंच कारणीभूत होते. **'वंदेमातरम्'** पत्र सरकारनें दडपून टाकल्यावर श्यामबाबूंनाही सरकारनें उचललें व चवकशी वगैरे कांहीं न करितां ब्रह्मदेशांत 'थ्याटमियो' येथें तुरुंगांत नेऊन टाकलें व तेथेंच ते आजतागाईत आहेत.

श्यामसुंदर चक्रवर्ती हे उत्कृष्ट बंगाली वक्ते आहेत. यांचा आवाज मोठा असून बंगाली भाषेमध्यें ते फार सुंदर भाषण करून श्रोत्यांचीं मनें आकर्षित करून घेतात असा त्यांचा लौकिक आहे. ते फार धर्मनिष्ठ व कर्मनिष्ट असून सनातन धर्मावर त्यांची अगदीं प्रथमपासून दृढ श्रद्धा आहे. यांची अत्यंत गरीबी आहे तथापि त्यांचें अंत:करण उदार व दयाळू असल्यामुळें ते लोकांना मदत करण्यास नेहेमीं तत्पर असतात. जवळ असलेलें द्रव्य कितीही अल्प असो, त्याचा परोपकारामध्ये विनियोग करण्यास ते कधींही मागेंपुढें पहावयाचे नाहींत. दारिद्र्यामुळें मनुष्याचें मन करपून जाऊन त्याच्या अगांतील औदार्य नष्ट होतें अशी आधुनिक प्रचलित कल्पना आहे. परंतु श्रीयुत श्यामसुंदर चक्रवर्ती या सत्पात्र ब्राह्मणाच्या अंत:करणांत औदार्याचा झरा असा अक्षय्य आहे कीं, त्याच्या आश्रयानें श्यामसुंदर बाबूंची प्रवृत्ति दिवसेंदिवस मनुष्यमात्रावर निर्मल प्रेम करण्याकडेच होत आहे. श्रीयुत श्यामसुंदर हे कुटुंबवत्सल आहेत व सरकारांतून त्यांच्या कुटुंबाला सांप्रत १०० रुपये महिना मिळत असतात. यांची शक्तिमत्ता विचाराच्या प्रांतांत असून ती जोरदार व बाकबगार लेखणीच्या व रसपरिपूर्ण रसनेच्या द्वारानें बंगालच्या व सर्व हिंदुस्थानच्या उपयोगी पडत असे परंतु अधिकाऱ्यांच्या कृतीमुळें या लाभास हा हतभागी देश

सांप्रत कांहीं काळ अंतरला आहे! श्यामसुंदर बाबूंप्रमाणेंच जर त्यांचे सर्व देशबांधव परमेश्वरावर पूण भरंवसा ठेऊन शांत चित्तानें व पुण्याचरणानें देशभक्तीच्या मार्गास लागतील, तर या भरतभूस चांगले दिवस दिसण्यास फार अवधि खचित लागणार नाहीं.

REFBK-0019243

कर्मयोगिन् (इंग्रजी)
सनृतवादिनी (संस्कृत साप्ताहिक)
संस्कृतचन्द्रिका (संस्कृत मासिक)
व इतर पुस्तकें व वर्तमानपत्रें

## वर्तमान एजन्सी, गिरगांव,

यांच्याकडे विकत मिळतील.
छापण्यासाठी कामें व प्रसिद्ध करण्यासाठी
मासिकेंही घेतली जातील.

संस्कृत, मराठी, इंग्रजी, गुजराथी व हिंदुस्थानी भाषेंत
पुस्तकें, जॉबवर्क, अपीलें व किरकोळ कामें

## राष्ट्रमत छापखान्यात

सुबक, व्यवस्थित रीतीनें व वक्तशीर करण्यांत
येतील. दर वगैरेची ऑफिसांत
चौकशी करावी.